Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# शिखर शिंगणापूर मंदिराच्या सभामंडपातील कामशिल्प - सामाजिक व सांस्कृतिक विश्लेषण

प्रा डॉ अरविंद सोनटक्के
संशोधन मार्गदर्शक,
इतिहास विभाग प्रमुख,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड.

प्रस्तावना:

भारतीय शिल्पकलेच्या विस्तीर्ण परंपरेत "कामशिल्प" हा एक संवेदनशील आणि कलात्मक विषय आहे. देवालयातील शिल्पे केवळ धार्मिक भावनांचे प्रतीक नसून ती मानवी संस्कृती, विचार आणि जीवनमूल्यांचे आरसे आहेत. समाजाच्या सांस्कृतिक मनाचे दर्शन या शिल्पांत घडते. काम हे मानवी जीवनाचे एक स्वाभाविक आणि अविभाज्य अंग आहे; म्हणूनच ते भारतीय तत्वज्ञानात लज्जास्पद नव्हे तर जीवनशक्तीचे प्रतीक मानले गेले आहे.

उद्देश - शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेव मंदिरातील सभामंडपातील तीन कामशिल्पे केवळ शारीरिक आकर्षणाचे दर्शन घडवत नाहीत, तर त्या माध्यमातून समकालीन लैंगिक मूल्यदृष्टी आणि कलात्मक परिपक्वता प्रकट होते. प्रस्तुत निबंधात या कामशिल्पांचे कलात्मक व सामाजिक विश्लेषण केले आहे.

भौगोलिक स्थान - अक्षांश:17.95° उत्तर

रेखांश: 75.09° पूर्व

महत्वपूर्ण शब्द – मंदिर, कामशिल्प, मैथुन, सभामंडप, कक्षासन, स्तंभ, अर्धस्तंभ ई.

शिखर शिंगणापूर मंदिर – स्थळ व ऐतिहासिक पार्श्वभूमी

शिखर शिंगणापूर हे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील एक प्राचीन गाव असून, येथे वसलेले शंभू महादेव मंदिर महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे कुलदैवत आहे. मंदिर आणि गावाची स्थापना यादव कुळातील चक्रवर्ती सिंधणदेव महाराजांनी केली असल्याचे उल्लेख आढळतात. या मंदिराला दगडी तटबंदी असून, परिसरात पाच मोठे नंदी कोरलेले आहेत.

शिखर शिंगणापूर मंदिर कोणी बांधले याबाबत दोन मुख्य मते आहेत. एका मतानुसार, देवगिरीच्या यादव वंशाचे राजा सिंघन यांनी शिंगणापूर गाव आणि मंदिर बांधले. दुसरे मत असे आहे की, मालोजीराजे भोसले यांनी इ.स. 1600 मध्ये येथे एक मोठा तलाव (आता शिवतीर्थ) बांधला, परंतु सध्याचे मंदिर शाहू महाराजांनी इ.स. 1735 मध्ये पूर्वीचे मंदिर कोसळल्यावर बांधले.[१]

मंदिराच्या विस्तीर्ण प्रांगणात दोन्ही बाजूंनी दोन आकर्षक दीपमाळा उभ्या आहेत. संपूर्ण परिसर फरसबंद असून आठ फूट उंच अशा मजबूत प्राकारभिंतीने वेढलेला आहे. या भिंतीत चारही दिशांना प्रवेशद्वारे आहेत. प्रांगणाच्या मध्यभागी शंभू महादेवाचे प्रमुख देवालय स्थित आहे. मंदिराचा

संपूर्ण आराखडा मुखमंडप, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह असा आहे. या देवालयाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्याला तीन मुखमंडप आहेत — एक पूर्वेला, दुसरा उत्तर दिशेला आणि तिसरा दक्षिणेला. मुखमंडपातून प्रवेश केल्यावर समोर विशाल सभामंडप दिसतो, मंदिर वास्तुशास्त्र प्रमाणे नंदीमंडप बाहेरच्या बाजूला वेगळा असायला हवा परंतु मध्ययुगीन रचनेचे मंदिर असल्याने तो सभा मंडपात आढळून येतो. सभामंडपातील स्तंभांवर कोरलेली शिल्पे विविधतेने नटलेली आहेत. अर्धस्तंभ आणि पूर्ण स्तंभांच्या कलात्मक रचनेमुळे सभामंडपाचे वितान नऊ विभागांत विभागलेले आहे. मध्यभागी चौरसाकार रांगशिला असून सभोवती कक्षासणाकार मांडणी आहे. या कक्षासणावर एकूण चौदा अर्धस्तंभ असून प्रत्येकावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे. रांगशिलेच्या कोपऱ्यांवरील आठ फूट उंच चार स्तंभांच्या तळभागावर (तळखडा) कोरीव काम नसले तरी त्यांच्या वरच्या भागावर चौकोनी, गोल आणि अष्टकोनी अशा अनुक्रमाने रचना दिसते. या स्तंभांवर शिकारीचे प्रसंग, नरसिंह, महिषासुर मर्दिनी, योगिक असणे करणारे तांत्रिक साधू, गज आणि वृषभ भ्रम शिल्प, वाजंत्री वाजविणारे, कुस्ती यांसारखे दृश्यात्मक शिल्प कोरलेले आहेत. उत्तरेकडील कक्षासनावरील दोन स्तंभावर तसेच दक्षिणेकडील कक्षासनाच्या एक स्तंभावर मैथुनशिल्प आढळतात.

अंतराळ आठ बाय बारा फूट क्षेत्रफळाचे चौरसाकार आहे. अंतराळातून पुढे गेल्यावर आठ बाय आठ फूट चौरस गाभारा असून तो गाभारा पंचशाखीय व्दारशाखा असलेला आहे. त्याच्या मध्यभागी चौकोनी आकाराचे शिवलिंग असून त्यावर दोन शाळुंका एकामागोमाग ठेवलेल्या आहेत.

सभामंडपातील कामशिल्पांचे कलात्मक वर्णन

'शृंगार' ही संज्ञा अत्यंत व्यापक, सूक्ष्म आणि बहुअर्थी स्वरूपाची आहे. सामान्यतः या संज्ञेचा अर्थ केवळ लिंग अथवा समागम यापुरता मर्यादित केला जातो; मात्र प्रत्यक्षात शृंगार ही संकल्पना केवळ शारीरिक पातळीवर सीमित नसून तिचा विस्तार सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैतिक तसेच मानसिक घटकांपर्यंत झालेला आहे. शृंगाराच्या संकल्पनेत शारीरिक आकर्षण, भावनिक संवेदनशीलता, मानवी शरीररचनेची जाण, लिंगविषयक कार्यपद्धती, तसेच त्यावर असलेले सामाजिक व नैतिक नियंत्रण यांचा समावेश होतो. तथापि, शृंगाराबाबत एक प्रचलित गैरसमज असा आहे की तो म्हणजे केवळ शारीरिक इच्छा; परंतु ही भूमिका अपुरी व संकुचित ठरते. वास्तवात शृंगाराच्या अनेक छटा असून शारीरिक इच्छा हा त्यातील एक अत्यल्प भाग आहे.

शृंगार संकल्पनेचा भारतीय संस्कृतीवर खोलवर प्रभाव पडलेला दिसून येतो. धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, ललितकला, काव्य आणि सौंदर्यशास्त्र या सर्व क्षेत्रांमध्ये शृंगाराची सर्जनशील अभिव्यक्ती आढळते. हा शृंगार केवळ लिखित स्वरूपापुरता मर्यादित न राहता विविध कामप्रतीकांच्या माध्यमातून समाजमनात रुजलेला, पूजनीय ठरलेला आहे आणि आजही तो श्रद्धेचा विषय राहिला आहे. शृंगाराचा उद्देश केवळ जैविक निर्मितीपुरताच मर्यादित नसून, तो मानवी जीवनातील आनंदाचा मूलस्रोत मानला जातो. या बहुआयामी शृंगारिकतेला भारतीय दर्शनशास्त्रातही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

भारतीय दर्शनपरंपरेने 'पुरुषार्थ चतुर्वर्ग' ही संकल्पना मांडून प्राचीन काळापासून चालत आलेल्या प्रवृत्ती आणि निवृत्ती या दोन विचारधारांमधील संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. पुरुषार्थ सिद्धांतामागील मूलभूत भूमिका अशी आहे की, मनुष्याने संसारात राहून, आपल्या व समाजाच्या प्रती असलेली कर्तव्ये पार पाडीत मोक्षाच्या ध्येयापर्यंत सहजतेने पोहोचावे. प्रवृत्ती म्हणजे केवळ सांसारिक चक्रात अडकणे आणि निवृत्ती म्हणजे त्यापासून पलायन करणे, असा सरळ अर्थ भारतीय संस्कृती मान्य करत नाही. प्रत्यक्षात प्रवृत्तीचा अर्थ असा कर्तव्यशील आचार होय, ज्यामुळे मानवी जीवनाला नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक उन्नती प्राप्त होईल. मानवाने असे कोणतेही कर्म करू नये जे त्याच्या मानव्यतेचा अधःपात घडवेल; याउलट शास्त्रसम्मत मार्गाने अर्थ व कामाच्या साहाय्याने धर्मपालन करत मोक्षमार्गाकडे वाटचाल करावी, हीच प्रवृत्तीची खरी संकल्पना आहे.

निवृत्तीचा अर्थ संसारातून संपूर्ण माघार घेणे नसून, समाजघातक, नैतिकदृष्ट्या अपायकारक व विनाशकारी प्रवृत्तींपासून दूर राहणे असा आहे. भगवद्गीतेत प्रतिपादित केलेला निष्काम कर्मयोग प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यातील समन्वय साधण्यावर भर देतो. या समन्वयातूनच संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनाची संकल्पना साकार होते.

पुरुषार्थ चतुर्वर्गात धर्माबरोबरच कामाचाही स्वीकार करण्यात आलेला आहे. 'काम' या संज्ञेचा अर्थ इच्छा असा असून, इच्छा ही मानवी क्रियेची मूलभूत प्रेरक शक्ती आहे. कामाची व्यवहारिक

व्याख्या करताना वात्स्यायन मुनी स्पष्ट करतात की, स्त्री-पुरुषांमधील शारीरिक स्पर्श, आलिंगन, चुंबन यांसारख्या प्रासंगिक सुखांपासून ते शरीराच्या विशिष्ट अवयवांच्या संवेदनांद्वारे प्राप्त होणाऱ्या अनुभूती, तसेच समागम क्रियेत प्रवृत्त होणे व त्यातून निवृत्त होईपर्यंत येणाऱ्या सर्व संवेदनात्मक अनुभूतींचा समुच्चय म्हणजे 'काम' होय. याच व्यापक दृष्टीकोनातून काम या संकल्पनेकडे पाहावे लागेल.

मंदिराच्या सभामंडपात तीन स्तंभावर कोरलेली तीन कामशिल्पे सुमारे १७ बाय ९ इंच आकारमानाची आहेत. प्रत्येक शिल्पात स्त्री-पुरुष युगुल प्रेममग्न अवस्थेत आहे, परंतु त्यांचा भावार्थ आणि रचना वेगवेगळी आहे.

(१) उत्तरेकडील पहिल्या शिल्पात दोन युगल मैथुनरत अवस्थेत आहेत. पहिले युगल हे रतीपूर्व क्रीडा करीत आहेत. नायिका उताणी झोपलेली असून पुरुषासोबत 'मुख मैथुन' करीत आहे. ज्यास कामाशास्त्रीय भाषेत 'औपरीष्टक' असे म्हणतात. [२] तर पुरुष नायिकेची योनी कुरवाळताना दिसून येतो. यात नायिकेस अत्यानंद होत असून ती आपल्या डाव्या हाताने त्यास प्रोत्साहन देत आहे. तर व्दितीय युगल इंद्राणी आसनात असून इंद्राणी याचा अर्थ इंद्राच्या पत्नीने सांगितलेला प्रकार होय. हा संभोगविधी सर्वप्रथम इंद्राणीने प्रयोगात आणला होता. म्हणून त्यास इंद्राणी म्हणतात. या प्रकारात पुरुषांनी आपल्या दोन्ही हातांनी स्त्रीच्या मांड्या पकडून तिच्या पायांना आपल्या काखेत घेऊन केलेला समागम होय.[३] रतिरहस्यानुसार, पुरुष हातावर स्वतःचा भार पेलून

स्त्रीवर उबडा पडलेला असतांना स्त्री आपले दोन्ही पाय पुरुषाच्या दोन्ही बाजूनी घेऊन व ते पुरुषाच्या पोटऱ्यावर दाबून धरुन पुरुषास आपल्या अंगाशी घट्ट जखडते व पुरुषास सखोल लिंग प्रवेश मिळाल्यामुळे समागमाचा आनंद मनसोक्त लुटीत राहतो. त्या मैथुन प्रकारास 'इंद्राणिक' आसन असे म्हणतात.(४) नायिका समाधानाने दोन्ही हात वरील बाजूस घेऊन पहुडली आहे.

(२) दुसऱ्या शिल्पात स्त्री-पुरुष दोघेही बसलेल्या स्थितीत आहेत. स्त्री पुरुषाच्या कवेत आहे. स्त्रीचा हात पुरुषाच्या खांद्यावर आहे. त्यांच्या मुद्रेत आत्मीयता जाणवते. परंतु एक उत्तेजित पुरुष त्या स्त्रीला प्राप्त करण्यासाठी धावतो आहे असे दिसते. तर बसलेल्या पुरुषाने उजव्या हातात प्रतिकारासाठी काहीतरी घेत असावे असे वाटते आहे. हे शिल्प बसलेल्या युगुलाचे संबंधातील सन्मान आणि मानवी नात्यांचे समतोल स्वरूप दाखवते. त्याच्याच बाजूला एक समागम शिल्प असून स्त्री उभ्या अवस्थेत असून पुरुष तिच्या कटीभोवती हात ठेवून 'धेनुक आसान' (५) मध्ये मैथुन क्रिया करतो आहे. त्यास 'व्यानत आसन' (६) या नावानेही ओळखले जाते. स्त्रीच्या मुखावर लाजरी परंतु संतुलित भावना आहे. वस्त्र आणि दागिने अलंकारिक असून शिल्पातील रेषांची प्रवाहीता उल्लेखनीय आहे. इतर कोणत्याही मंदिरातील मैथुन शिल्प प्रमाणे हे शिल्प निर्वस्त्र नसून तत्कालीन समाज जीवन पाहता उत्तर मध्ययुगीन कल्पनेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. कदाचित जीर्णोध्दार समयी ही बंधने पाळली गेली असावीत. या शिल्पात तांत्रिक विधी करताना नायिकेच्या हाती खाली ठेवलेला कलश दिसतो आहे.

(३) प्रस्तुत दक्षिणेकडील तिसऱ्या शिल्पात काम शास्त्रातील इंद्राणी आसन असून नायक नायिकेचे स्तन मर्दन करीत उजव्या हाताने तिचे केस कुरवाळीत मैथुन क्रीडा करतो आहे; त्यांच्या शारीरिक हालचालीतून उत्स्फूर्त भावदर्शन होते. कलाकाराने शिल्पाच्या सीमित आकारातही गती, लय आणि लावण्य यांचा संगम साधला आहे. बाजूलाच दोघेजण कुस्ती खेळताना कोरलेले असून त्यातून समागम आणि कुस्ती मधील सांकेतिक भावना दाखविण्याचा प्रयत्न असावा असे वाटते. तौलनिक दृष्ट्या शिल्प प्रमाणबध्द नसले तरी; तीनही शिल्पांमध्ये दगडावर अल्प खोलीत सूक्ष्म कोरीव काम, स्पष्ट रेषा आणि भावनांची संगती साधण्यात कलाकार यशस्वी झालेला दिसतो आहे..

कामशिल्प आणि समाजमन – सामाजिक व सांस्कृतिक विश्लेषण

भारतीय समाजाने कामशिल्पाकडे केवळ लैंगिकतेच्या दृष्टिकोनातून न पाहता, सृष्टीच्या सातत्याचे प्रतीक म्हणून पाहिले आहे. मंदिरातील कामशिल्प हे "काम म्हणजे जीवनशक्ती" या दृष्टिकोनातून उद्भवलेले आहे. शिखर शिंगणापूरच्या शिल्पांत काम शिल्प निर्मिती मागील तात्विक अधिष्ठान पाहता स्त्री-पुरुष नाते हे केवळ शारीरिक नाही तर भावनिक, सामाजिक आणि धार्मिक अंगांनी पवित्र मानले गेले आहे. या शिल्पांत स्त्री ही सहचरिणी आहे; पुरुषाची अधीन नाही, तर समसमान साथीदार आहे. हे जाणवल्याशिवाय राहत नाही. या शिल्पांतून काम ही विषयवृत्ती नसून, समाजमनातील प्रकृती आणि पुरुष या द्वैताचे एकत्व आहे. कलाकाराने हे तत्व शिल्परूपात अभिव्यक्त केले आहे.

शैव परंपरेतील कामशिल्पांचा तात्विक संदर्भ

शैव परंपरेत "काम" हा केवळ इंद्रियसुखाचा विषय नाही, तर शक्ती आणि शिव यांच्या एकत्वाचे प्रतीक आहे. "शिव" म्हणजे निर्गुण चैतन्य, तर "शक्ती" म्हणजे सृजनशक्ती. या दोघांच्या संयोगातूनच विश्वनिर्मिती होते. म्हणूनच शैव मंदिरांमध्ये कामशिल्प सहजपणे समाविष्ट झाले आहेत. असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. शिखर शिंगणापूरचे सभामंडप हे केवळ उपासनेसाठी नव्हे तर जीवनतत्त्वांचे दर्शन घडविणारे स्थळ आहे. मंदिर म्हणजे विश्वाचे प्रतीक — आणि कामशिल्प म्हणजे त्या विश्वातील सृजनाच्या मूलशक्तीचे प्रतीक आहे.

भारतीय तत्त्वज्ञानातील , धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांमध्ये काम हे पूर्णतः त्या दंपती वर अवलंबून आहे. त्यामुळे मंदिराच्या शिल्पात त्याचे स्थान नैसर्गिकच आहे. शैव साधनेतही कामाचे sublimation (उर्ध्वगमन) होते; भोगातून योगाकडे जाण्याचा मार्ग. शिल्पकारानेही हाच तात्त्विक संदेश कलात्मकतेतून दिला आहे.

निष्कर्ष

शिखर शिंगणापूर मंदिरातील सभामंडपातील कामशिल्पे केवळ कला नव्हेत, तर शिल्पांतील कामभावना ही सृजनशक्तीचे आणि मानवी संबंधातील समरसतेचे प्रतीक आहे. या शिल्पांतून भावनिक निकटता आणि सृजनशीलतेवरील श्रद्धा स्पष्टपणे दिसते. भारतीय शिल्पकलेने कामाला अधोगती

नव्हे तर जीवनाचे सौंदर्य मानले. म्हणूनच अशा शिल्पांचा समावेश शैव मंदिरांत सहजपणे झाला. आज या शिल्पांकडे पाहताना आपण केवळ प्राचीन कला नव्हे, तर मानवसंस्कृतीच्या एका परिपक्व आणि समतोल विचारधारेचे दर्शन घेतो.

प्राचीन काळात निर्माण झालेल्या मिथुनशिल्पांना केवळ सौंदर्यदृष्ट्या नव्हे, तर सखोल तात्त्विक अधिष्ठान देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो. या मिथुनशिल्पांमधून आत्मा आणि परमात्मा यांच्या ऐक्याचे प्रतीकात्मक दर्शन घडविले गेले आहे. विशेषतः मिथुनशिल्प म्हणजे शिव आणि शक्ती यांच्या संयोगातून प्राप्त होणाऱ्या मोक्षाची मूर्त अभिव्यक्ती मानली जाते. मंदिर हे परमात्म्याने निर्माण केलेल्या विश्वाचे लघुरूप मानले गेले असल्याने, त्या विश्वातील जीवनचक्राचा अविभाज्य भाग असलेल्या कामतत्त्वाचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने मंदिरांच्या स्थापत्यात कामशिल्पांचा समावेश करण्यात आला.

मानव अनेकदा समागम ही एक नैसर्गिक शारीरिक गरज म्हणून पूर्ण करतो; परंतु मानवी कल्पनाशक्ती या जैविक क्रियेला शृंगाराच्या पातळीवर नेऊन तिचे कलात्मक रूपांतर करते. या प्रक्रियेत कामक्रीडा केवळ क्रीडा न राहता ती कलानिर्मितीचा विषय ठरते. मंदिरांवरील कामशिल्पांकडे पाहिल्यास हे स्पष्ट होते की, कोणत्याही लेखनसाधनांचा वापर न करता, छन्नी आणि हातोड्याच्या साहाय्याने दगडावर कोरलेले हे कामशास्त्रातील शृंगारिक संदेश देणारी शिल्पनिर्मिती आहे.

या शिल्पांवर कामशास्त्र आणि तंत्रशास्त्र यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. अन्यथा कामशास्त्रात वर्णन केलेली विशिष्ट आसने मंदिरांच्या भिंतींवर कोरण्यामागे दुसरे कोणतेही ठोस प्रयोजन दिसून येत नाही. ही शिल्पे हेतुपुरस्सर आणि बौद्धिक विचारपूर्वक कोरलेली असून, त्यांचे मूळ कामशास्त्रीय परंपरेत असल्याचे संशोधनातून सिद्ध होते.

संदर्भसूची -

१. Google (शिखर शिंगणापूर मंदिर कोणी बांधले)

२.डॉ. शास्त्री आचार्य रामचंद्र, अनु., वात्सायन का कामसूत्र, (२/९/१-४५), मनोज पब्लिकेशन दिल्ली,२००४, पृ. १३२-१३९.

३. कुलकर्णी दत्ता जी., अनु., संपूर्ण कामसूत्र, राजेश प्रकाशन, पुणे, पृ.-62;

४. शर्मा वासुदेव, अनु., रंगेलरतिशास्त्र, नवजीवन प्रकाशन,पुणे, १९७१, पृ. ८६.

५. डॉ. शर्मा रामानंद, व्याख्याः रतिरहस्यम् (१०/३४), कृष्णदास अकादमी वाराणसी,१९९४ पृ. १२५: डॉ. त्रिपाठी रामसागर, संपा; नागरसर्वस्वम (३१/१), चौ.सं. प्रतिष्ठाण, दिल्ली, २००४. पृ. ११३ डॉ. त्रिपाठी रामसागर, अनु. अनंगरंग (१०/२८) चौ.स. प्रतिष्ठान, दिल्ली, २००४, पृ. ३१०; वैद्य शास्त्री

शकर दत्त, अनु. रतिरत्नप्रदीपिका (५/३०) कृष्णदास अकादमी वाराणसी. २००२ पृ.५६; शास्त्री देवदत्त, अनुः हिंदी कामसूत्र (२/६/३९), चौ.स.स. वाराणसी, २००३, पृ. ३१६

६. दीक्षित मथुराप्रसाद केलिकुतूहलम् (८/८४) कृष्णदास अकादमी, वाराणसी. वि.स. २०५८,पृ. ७८

७. प्रत्यक्ष सर्वेक्षण



स्तंभ क्रमांक 01



स्तंभ क्रमांक 02



स्तंभ क्रमांक 03